(405)

----

381

क्रमांक : बिएम्आर्डीए/एम्टीजी/२०.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे(पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

दिनांक : २९ जानेवारी, १९८०

प्राधिकरणाच्या दिनांक १३ डिसेंबर, १९७९ रोजी भरलेल्या विसाव्या सभेच्या कार्यवृत्तांची प्रत सोबत जोडली आहे. कांही हरकतीचे मुद्दे असल्यास सभासदांनी कृपया कळवावेत, ही विनंती.

( कार्यवृत्ताची इंग्रजी प्रत दिनांक १७ जानेवारी, १९८०च्या पत्रान्वये पाठविण्यांत आली आहे.)

सचिव,
कार्यकारी समिती.

Pl min today

Issued on 18 FEB 1980

प्रति:
सर्व सदस्य.

been ask
proceedin

rt is un
tion
inal stag

pr cess.

s has
develop-
sed in
. The
ed to

be

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
विसाव्या सभेचे कार्यवृत्त.

दिनांक : १३.१२.१९७९.

वेळ : सकाळी ११.०० वाजता.

ठिकाण : गृहनिर्माण भवन, ३ रा मजला,
वांद्रे.

सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची व निमंत्रितांची यादी सोबत जोडली आहे.

उद्घाटनाच्या भाषणात अध्यक्षांनी कुलाबा जिल्हयातील पंचायत समितीच्या अध्यक्षांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून निवडून दिलेल्या श्री.अनंत नारायण ठाकूर हयांचे स्वागत केले व माजी मुख्य सचिव श्री.पी.डी.कसबेकर यांनी केलेल्या सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला. श्री.कसबेकर दिनांक १.१०.१९७९ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संबंधात झालेल्या महत्वाच्या घटनांचीही संक्षिप्त रुपरेषा निवेदन केली. (अध्यक्षांच्या भाषणाची प्रत सोबत जोडली आहे.)

२. मंत्री महोदयांच्या भाषणानंतर बोलतांना कांही सदस्यांनी असे निवेदन केले की, प्राधिकरणाने ठाणे नगरपालिका परिषदेसाठी कोणत्याही योजना हाती घेतलेल्या नाहीत. गृहनिर्माण, नागरी नूतनीकरण आणि परिसर विज्ञान मंडळाच्या सदस्य-सचिवांनी असे निवेदन केले की, पंचपाखाडी येथे एक आणि चितळसर-मानपाडा येथे एक अशा एकूण २ क्षेत्र विकास योजना प्राधिकरणाने हाती घेतल्या आहेत.

३. मुंबई महानगर प्रदेश पाणी पुरवठा आणि मलोत्सर्ग योजनेत समाविष्ट करण्यांत आलेल्या १०४ गावांची नांवे आपल्याला निवेदन करावी अशी इच्छा कांही सदस्यांनी व्यक्त केली. ही माहिती सर्व सदस्यांना पाठविण्याचे आश्वासन महानगर आयुक्तांनी दिले.

४. त्यानंतर कार्यसूचीनुसार सभेचे कामकाज सुरु करण्यांत आले.

<u>बाब क्र.१</u> : <u>दिनांक २८ जून, १९७९ रोजी झालेल्या १९व्या सभेच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे.</u>

कार्यवृत्तास पुष्टी देण्यांत आली.

<u>बाब क्र. २</u> : <u>दिनांक २८ जून, १९७९ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या या पूर्वीच्या (१९व्या) सभेच्या कार्यवृत्तावर करण्यांत आलेली कार्यवाही.</u>

केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

बाब क्र.३...२/

बाब क्र. ३ : खालील विनियमांचे मसुदे -

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) विनियम १९७९ आणि,

२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळ सदस्यांस भत्ते) विनियम १९७९.

प्राधिकरणाने कार्यसूची टिप्पणीवर विचार विनिमय केला आणि खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १६७ :

असा ठराव करण्यांत येत आहे की, स्थायी समितीने आपल्या दिनांक १४ जुलै, १९७९ रोजी झालेल्या १४ व्या सभेत ठराव क्र.१०९ व्दारा शिफारस केलेले :-

१) जोडपत्र 'ड' मध्ये दर्शविल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) विनियम १९७९ व

२) जोडपत्र 'ई' मध्ये दर्शविल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळ सदस्यांस भत्ते) विनियम १९७९

संमत करण्यात येत आहेत.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, हे विनियम प्राधिकरणाने सन १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम ५० अन्वये तयार केले असे समजावे.

बाब क्र. ४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचाऱ्यांचा अंशदायी भविष्य निर्वाह निधि) विनियम १९७९.

निधीस द्यावयाच्या वर्गण्यांचा आणि अंशदानांचा हिशोब करतांना महागाई भत्ता विचारात घ्यावा अशी विनंती समाविष्ट असलेल्या कर्मचाऱ्यांच्या युनियनने पाठविलेल्या निवेदनाविषयी कांही सदस्यांनी चौकशी केली. हयाबाबत असे स्पष्टीकरण देण्यांत आले की, (१) कर्मचाऱ्यांचे निवेदन सभेपूर्वी फक्त २ दिवसच आले, व म्हणून ते विचारात घेऊन अंतिम अवलोकन करता आले नाही.(२) प्रस्तुत विनियम शासकीय संस्थांच्या नियमांच्या धर्तीवर तयार केलेले आहेत. तथापि, युनियनची वरील विनंती सदर योजनेस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यांत येईल.

महानगरपालिका आयुक्तांनी असे निदर्शनास आणले की, कर्मचाऱ्यांच्या विनंतीचा विचार करतांना तिचा इतर सरकारी आणि निमसरकारी संस्थांवर होणारा परिणामही विचारात घ्यावा.

कांही सदस्यांनी....३/

काही सदस्यांनी असेही सुचविले की एकाद्या कर्मचाऱ्याचे अकाली निधन झाल्यास "कुटुंब वेतन" यासारखी एकादी योजना स्वीकारून त्याच्या कुटुंबाला मदत करण्याची आवश्यकता आहे. 'पेन्शन योजने' सारखी एकादी नियमित योजना कर्मचाऱ्यांना लागू करण्याबद्दलच्या प्रश्नावरही विचार करण्यात यावा असेही सभासदांनी सुचविले. महानगर आयुक्तांनी असे आश्वासन दिले की, हे मुद्दे अवश्य विचारात घेण्यात येतील. त्याच्या परिणामांचा विचार करण्यात येईल आणि आवश्यक वाटल्यास योग्य ते प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यात येतील. त्यानंतर प्राधिकरणाने विनियमास मान्यता दिली व खालील ठराव संमत केला.

<u>ठराव क्र. १६८</u> :

असा ठराव करण्यात येत आहे की, स्थायी समितीने आपल्या दिनांक १४ जुलै, १९७९ रोजी झालेल्या १४ व्या सभेत संमत केलेल्या ठराव क्र. १०० अन्वये शिफारस केलेल्या, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचाऱ्यांचा अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम, १९७९ चा मसुदा संमत करण्यात येत आहे. हे विनियम प्राधिकरणाने सन १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम ५० अन्वये तयार केले असे समजण्यात येईल.

<u>बाब क्र.५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १३ खालील प्राधिकरण-अधिसूचना.</u>

हया बाबीवर बराच ऊहापोह झाला. विशेषत: सदस्यांनी वांद्रे-कुर्ला समूहाच्या विकास कार्यातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची भूमिका व वांद्रे-कुर्ला समूहाच्या क्षेत्रातील घट हे मुद्दे उपस्थित केले आणि वांद्रे-कुर्ला क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाला आळा घालण्याच्या आवश्यकतेच्या गरजेवर भर दिला.

नगर विकास मंत्र्यांनी वांद्रे-कुर्ला समूहाचा संपूर्ण इतिहास नमूद करून असे निदर्शनास आणून दिले की, शासनाने आधीच मंजूर केलेल्या या समूहाच्या वेशीवरील भाग समूहातून वगळणे हा हया सभेपुढील विषय नसून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या कलम १३ अन्वये काढलेल्या दिनांक १. .७ च्या क्रमांक एम्सी/आर्डीएम्/३२८५/७७, या प्राधिकरणाच्या अधिसूचनेत करण्यात आलेली दुरुस्ती हा आहे. प्रस्तुत भाग हया प्रदेशातून वगळण्याचे कारण असे . तो विश्वविद्यालयाचे प्रांगण, गृहनिर्माण मंडळ, उत्तरेकडील इतर मालमत्ता व दक्षिणेकडील धारावीच्या गलिच्छ वस्त्या यांनी व्यापलेला आहे. आणि म्हणून हा संपूर्ण भाग प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्यात आल्याखेरीज त्याठिकाणी नियोजन करून तो भाग विकसित करण्यासाठी प्राधिकरणाला फारच थोडा वाव होता. विशेषत: वांद्रे-कुर्ला समूहाच्या मूळ क्षेत्रात येणाऱ्या धारावीच्या भागाबद्दल सभासद उत्सुक दिसले व हया क्षेत्राचा विकास करण्याची जबाबदारी प्राधिकरणाने स्वीकारावी अशी इच्छा व्यक्त केली. मंत्री महोदय म्हणाले की, संपूर्ण क्षेत्राचा विकास प्राधिकरणानेच

करावा अशी....४/

करावा अशी मूळ कल्पना होती. परंतु नंतर विशेषत: मुंबई महानगर पालिका आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण आपापल्या जमिनीवरील ताबा सोडण्यास तयार नव्हते. म्हणून असे ठरविण्यात आले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या विकास योजनेनुसार वरील संस्थांनी हया जमिनींचा विकास करावा व उरलेल्या मोकळया जमिनींत प्रारंभिक सुखसोयी,ज्यात चॅनलायशेशनचाही समावेश आहे अशा, उपलब्ध करण्यासाठी बराच खर्च करावा लागेल अशा ठिकाणचा विकास प्राधिकरणाने करावा असे ठरले.

तथापि, ज्या विषयावर अधिक चर्चा करण्यास व विशेषत: प्राधिकरणाची मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भातील भूमिका काय आहे हे जाणून घेण्यास सभासद उत्सुक होते. म्हणून असा निर्णय घेण्यात आला की,(१) हया बाबींचा विचार विनिमय लांबणीवर टाकण्यात यावा आणि, (२) प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला प्रकल्पाबाबत तपशीलवार टिप्पणी प्रसृत करावी.

बाब क्र.६ : वडाळा येथील ट्रक-टर्मिनलचा शक्याशक्यता अभ्यास.

सदस्यांनी सर्वसाधारणपणे ट्रक टर्मिनलच्या कल्पनेचे स्वागत केले व ही योजना शक्यतो लवकर कार्यवाहीत आणावी असे आवर्जून सांगितले. अभ्यासु व पध्दतशीरपणे तयार केलेल्या या अहवालाचा गौरवपूर्ण शब्दात सभासदांनी उल्लेख केला व या गुणगौरवाची नोंद घेण्यात यावी असे ठरले. प्रकल्पाच्या खर्चाविषयी काही प्रश्न उपस्थित केले गेले परंतु हा केवळ शक्याशक्यता अभ्यास आहे असे स्पष्टीकरण करण्यात आले. एकदा हा अहवाल तत्वत: मान्य केल्यावर प्रकल्पा-वरील खर्च आणि इतर तदनुषंगिक तपशील नंतर तयार करण्यात येईल. सभासदांनी अशी सूचना केली की लहान आकारांची वाहने (विशेषत: हातगाडया) उभी करुन ठेवण्यासाठी जागा राखून ठेवण्यात यावी. व तसेच गोदामाजवळ ज्या कामगारांना झोपावे लागते अशांसाठी शयनशाला बांधण्यात यावी.

महापालिका आयुक्तांनी २ मुद्दे उपस्थित केले : १) हया विकासाचा आसपासच्या भागावर होणारा परिणाम आणि २) मुंबई महानगर-पालिका या विभागातील विकास कार्यासाठी परवानगी नाकारु शकेल काय.

वहातूक आणि दळणवळण मंडळाचे सदस्य-सचिव यांनी असा खुलासा केला की, वडाळा-आणिकच्या व्यापक क्षेत्र विकासाचा ट्रक टर्मिनल हा केवळ एक भाग आहे. ट्रक टर्मिनलचे बांधकाम होईपर्यंत इतर विकास कार्या-वरील नियंत्रणाबाबत असे स्पष्टीकरण देण्यात आले की प्राधिकरणाने या संपूर्ण क्षेत्रासाठी यापूर्वीच नकाशे तयार केले असून ते शासनाकडे पाठविले आहेत. शासनास अशी विनंती करण्यात आली आहे की, महाराष्ट्र प्रदेश आणि नगर रचना अधिनियमाचे कलम १५४ अन्वये आदेश देऊन (ट्रक टर्मिनलचा समावेश असलेल्या)

प्रसृत.....५/

प्रस्तुत आरक्षणास विकास योजनेत समाविष्ट करण्यांत यावे असे महानगरपालिकेस सांगण्यांत यावे. महापालिका आयुक्तांनी असे आवर्जून सांगितले की, ही कार्यवाही लौकर करण्यांत यावी अन्यथा विकास नियंत्रण नियमान्वये अनुज्ञेय असलेल्या इतर प्रकारच्या विकासास परवानगी नाकारणे आपणांस अवघड होईल आणि तसे झाल्यास ट्रक टर्मिनलचा हेतूच बारगळेल.

मुंबई पोर्ट ट्रस्टच्या पुढील हरकती व सूचना, प्राधिकरणाच्या निदर्शनास आणाव्यात असा आदेश मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अध्यक्षांनी आपणांस दिला असल्याचे ट्रस्टच्या प्रतिनिधीने सांगितले.

१) हया विभागाचा घर बांधणीसाठी विकास करण्यांत यावा.
२) ट्रक टर्मिनलमुळे हया विभागाच्या पर्यावरण व प्रदूषण विषयक समस्येत बहुधा भर पडेल.
३) आपल्या विभागातील कांही उद्योगधंदे स्थलांतरित करण्याचा पोर्ट ट्रस्टचा विचार आहे, व ही जागा त्यासाठी राखून ठेवण्यांत यावी.
४) ट्रक टर्मिनल, वडाळा व चेंबूर यांच्यामधील दलदलीच्या प्रदेशांत कोठेतरी बांधण्यांत यावा, व
५) हया जमिनींवर अगोदरच कांही अनधिकृत बांधकाम झालेले आहे.

प्रस्तावित प्रकल्पास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी पोर्ट ट्रस्टचे सर्व मुद्दे विचारात घेण्याचे वाहतुक व दळणवळण मंडळाच्या सदस्य-सचिवांनी मान्य केले. दुसऱ्या एका प्रश्नांस उत्तर देतांना त्यांनी हेही स्पष्ट केले की ज्या जागेवर हा प्रकल्प बांधावयाचा आहे ती जागा पोर्ट ट्रस्टच्या मालकीची नाही. प्रकल्पांत अंतर्भूत असलेली जवळजवळ सर्वच जागा महाराष्ट्र सरकारच्या अगर भारत सरकारच्या मालकीची आहे.

प्राधिकरणाने असे ठरविले की, सदरहू प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यांत यावी व पोर्ट ट्रस्टच्या मुद्यांचा विचार त्यानंतर वहातूक व दळणवळण मंडळाने करावा. प्राधिकरणाने नंतर खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र. १६९ :</u>

असा ठराव करण्यांत येत आहे की, वहातुक आणि दळणवळण मंडळाने वडाळा-आनिक येथील ट्रक टर्मिनलबाबत तयार केलेल्या शक्याशक्यता अहवालावर विचार विनिमय करुन प्राधिकरण याव्दारा वडाळा-आनिक येथे ट्रक टर्मिनलसाठी संपादन करुन विकसित करावयाच्या भूमीवर, संपर्क मार्गासह ट्रक टर्मिनल स्थापन करुन त्याचे बांधकाम करावयाच्या वाहतुक व दळणवळण मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देत आहे व या सभेची बाब क्र.६ म्हणून कार्यसूची टिप्पणी सोबत जोडलेल्या शक्याशक्यता अभ्यासाच्या अहवालांत दिलेल्या तपशिलानुसार प्रकल्पांतर्गत उद्दिष्टांस व प्रस्तावास अनुमोदन देत आहे.

पुढे असा....६/

पुढे असाही ठराव करण्यांत येत आहे की, वरील प्रकल्पाची त्वरित कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरण याव्दारा स्थायी समितीस, कार्यकारी समितीस आणि महानगर आयुक्तांस त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत येणारी सर्व आवश्यक कार्यवाही, ज्यांत विधेयक तयार करण्याचाही समावेश आहे अशी, करण्यास अधिकार देत आहे.

बाब क्र.७ : १९७८-७९ सालचे प्राधिकरणाचे लेखे व त्यावरील वित्तीय सल्लागारांचा अहवाल.

लेख्यांना आणि अहवालास मान्यता देण्यांत आली.

बाब क्र. ८ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प मुदतीत प्रस्तावित वाढ

प्राधिकरणाने प्रकल्पाच्या प्रस्तावित मुदत वाढीस मान्यता दिली आणि खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १७० :

असा ठराव करण्यांत येत आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेस आणि मुंबई विद्युत् पुरवठा आणि परिवहन उपक्रमास मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांत अनुस्यूत असलेली सर्व कामे आणि प्रापणे पूर्ण करतां यावी व प्राधिकरणाची मान्यता अपेक्षित धरुन प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी यापूर्वीच मान्यता दिलेल्या कर्ज निधीतून रक्कम काढतां यावी म्हणून प्राधिकरण, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पूर्ण करण्याची तारीख ३१ डिसेंबर, १९७९ पासून ३१ डिसेंबर, १९८२ पर्यन्त व कर्जाची अखेरची तारीख ३० जून, १९८० पासून ३० जून, १९८३ पर्यन्त वाढविण्यास याव्दारा घटनोत्तर मान्यता देत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, वरील प्रमाणे प्रकल्पाची मुदत वाढवून घेण्यासाठी व कर्जविषयक करार, दुय्यम कर्जविषयक करार इत्यादीमध्ये उचित दुरुस्त्या करण्यासाठी प्राधिकरणातर्फे जागतिक बँकेशी संपर्क साधण्यास आणि आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांस याव्दारा अधिकार देण्यांत येत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, प्राधिकरणाची मान्यता अपेक्षित धरुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी वरील मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्र. ९ : जागतिक बँक, भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि सार्वजनिक वर्गणीच्या सहाय्याने महाराष्ट्र पाणी पुरवठा आणि मलोत्सर्ग मंडळाने हाती घ्यावयाच्या भारत-महाराष्ट्र पाणी पुरवठा आणि मलोत्सर्ग प्रकल्पाचा तपशील प्रतिवेदीत करणे.

ही बाब सदस्यांच्या माहितीसाठी सभागृहापुढे ठेवण्यांत आली व प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली. १०४ खेडयांची यादी सभासदांना पाठविण्यांत यावी असे अध्यक्षांनी सांगितले.

-----0×0------

हो: २९१८०.

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची २० वी सभा

दिनांक : १३ डिसेंबर, १९७९.

## सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हशू अडवाणी<br>मंत्री, नगरविकास आणि<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. | अध्यक्ष. |
| २) | श्री. आर्. के. चिम्बूलकर,<br>मुंबईचे महापौर | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. बी. एल्. पाटील,<br>दुग्धशाळा विकास व खार जमिनी, राज्यमंत्री. | सदस्य |
| ४) | श्री. बी. एच्. शेटे,<br>अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका | " |
| ५) | श्री. पी. डी. निकळंकर,<br>अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगर पालिका | " |
| ६) | श्री. ई. आर्. कोपर्डे,<br>मुंबई महानगर पालिका सदस्य. | " |
| ७) | श्री. व्ही. जी. धारप,<br>मुंबई महानगर पालिका सदस्य. | " |
| ८) | श्री. ए. डब्ल्यू. पाटील.<br>मुंबई महानगर पालिका सदस्य | " |
| ९) | श्री. सी. सी. भुजबळ,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | " |
| १०) | श्री. ए. एन्. ठाकूर,<br>अध्यक्ष, पंचायत समिती, उरण | " |
| ११) | श्री. डी. जी. कामत,<br>विधान सभा सदस्य | " |
| १२) | श्री. जी. एम्. कोळी,<br>विधान सभा सदस्य | " |
| १३) | श्री. डी. एन्. पाटील,<br>विधान सभा सदस्य. | " |
| १४) | श्री. सोनुभाऊ बसवंत,<br>विधान परिषद सदस्य. | " |
| १५) | श्री. डी. बी. सुळे,<br>विधान परिषद सदस्य | " |
| १६) | श्री. राम कापसे,<br>अध्यक्ष, सिडको, | " |
| १७) | श्री. बी. के. चौगुले,<br>महानगरपालिका आयुक्त<br>मुंबई महानगर पालिका. | " |

१८) श्री.....२/

१८) श्री.एन्.जी.के.मूर्ती,                                  "
अध्यक्ष,
जलसंपत्ती व्यवस्थापन मंडळ

१९) श्री.डी.के.अफझुलपुरकर,                                  सदस्य-सचिव
महानगर आयुक्त.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

निमंत्रित :
१) व्यवस्थापकीय संचालक,
सिडको.
२) शासन सचिव, नगरविकास
विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

----०x०----

डो: २९१८०.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची २० वी सभा

दिनांक : १३ डिसेंबर, १९७९.

### अध्यक्षांचे भाषण

प्राधिकरणाच्या या २० व्या सभेस उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचे स्वागत करण्यास मला आनंद होत आहे. कुलाबा जिल्हयाच्या पंचायत समितीचे अध्यक्ष श्री. अनंत नारायण ठाकूर यांची प्राधिकरणाचे सदस्य म्हणून निवड झाली असून त्यांची आपल्याशी ओळख करुन देण्यात मला आनंद होत आहे. माजी मुख्य सचिव, श्री.पी.डी.कसबेकर, यांनी प्राधिकरणाचे सदस्य व प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष या नात्याने केलेल्या सेवेची गौरवपूर्ण नोंद घेणे उचित ठरेल.

२. हयापूर्वी झालेल्या बैठकीनंतर घडलेल्या महत्वाच्या घटनांची अत्यंत थोडक्यांत माहिती मी सदस्यांना देऊ इच्छितो. वांद्रे-कुर्ला समूह प्रकल्पांतील पूल मजबूत करणे आणि जलव्दार बांधणे याविषयीचा सल्लागारांचा अहवाल आणि खर्चाचे अंदाज हाती आले असून खर्चाच्या अंदाजांना स्थायी समितीने मान्यता दिली आहे. ज्यांच्या आधिपत्याखाली हे पूल आहेत त्या संस्थामार्फत पूल मजबूत करण्याचे काम चालू कामाच्या हंगामात हाती घेण्याचा विचार आहे. माहीम खाडी रुंद करुन ती खोल करण्याचे काम पुढील हंगामात हाती घेण्यांत येईल. हया प्रकल्पामुळे पर्यावरणांत सुधारणा होईल. जमिनीत भर टाकून पुन:प्रापण केलेल्या जादा क्षेत्रांमध्ये गजबजलेल्या दक्षिण मुंबईतून व्यापारी रोजगारांचे स्थलांतर करतां येईल.

३. वाशी येथे मार्च १९८० पर्यंत आवश्यक इमारती बांधण्यासाठी व इतर प्रारंभिक सुविधांची तरतूद करण्यासाठी वित्त सहाय्य म्हणून स्थायी समितीच्या मान्यतेने कृषि उत्पन्न बाजार समितीला ५० लाख रु.आगाऊ म्हणून देण्यांत आले असून मार्च १९८० ही मुंबईच्या उच्च न्यायालयाने डंकन रोड येथील कांदे-बटाटयाच्या व्यापाऱ्यांना तुर्भे येथे स्थलांतरित होण्यासाठी मुदत दिलेली आहे.

४. मुंबई महानगर प्रदेशांतील स्थानिक संस्थांना मोठया प्रमाणावरील विकास कार्य हाती घेणे अशक्य असल्यामुळे विकास प्रकल्प तयार करुन ते कार्यवाहीत आणण्यासाठी प्रस्तुत स्थानिक संस्थांना वित्तीय व तांत्रिक सहाय्य देण्याचा प्राधिकरणाचा विचार आहे. वित्त सहाय्यासाठी प्राधिकरणाने सुमारे

30 योजनांची.....२/

30 योजनांची निवड केली आहे. व त्यासाठी १९७९-८० च्या वार्षिक अंदाज पत्रकांत ५० लाख रुपयांची एकरकमी तरतूद करण्यांत आली आहे. बाजार पेठ बांधण्याच्या योजनेसाठी अलिबाग नगरपालिका परिषदेला २ लाख रुपयांचे व फेरीवाल्यांकरिता बाजारपेठ बांधण्याच्या योजनेसाठी डोंबिवली नगरपालिका परिषदेला १.८७ लाख रुपयांचे कर्ज देण्यांत आलेले आहे. वसई येथील औद्योगिक वसाहत योजना व खोपोली आणि अलिबाग येथील क्षेत्र विकास योजनांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता दिली असून यथावकाश कर्ज देण्यांत येईल.

५. दरम्यान वडाळा येथील ट्रक टर्मिनलचा शक्याशक्यता अभ्यास पूर्ण झाला आहे. तसेच वाशी येथील जलमार्गाची संकल्पचित्रे, नकाशे आणि खर्चाचे अंदाज व कळवा ते तुर्भे पर्यन्त रेल्वेचा मालवाहू फाटा बांधण्यासंबंधीचा अभ्यास हाती घेण्यांत आलेला आहे. हे अभ्यास चालू वित्तीय वर्षात पूर्ण होण्याची शक्यता आहे. रेल्वेचा फाटा बांधण्याविषयीचा अभ्यास रेल इंडीया टेक्नीकल आणि इकोनोमिक सर्व्हिसेस् या संस्थेकडे सोपविला आहे.

६. प्राधिकरणाच्या वहातूक व दळणवळण मंडळाने बेसिक ट्रान्सपोर्ट आणि कम्युनिकेशन स्टॅटिस्टिक्स् फॉर दी बीएम्आर् १९७९ हया नावाची पुस्तिका प्रसिध्द केली आहे. सदस्यांच्या माहितीसाठी पुस्तकेची प्रत सभागृहापुढे ठेवली आहे.

७. ६ शहरांना पाणीपुरवठा व मलोत्सर्ग व्यवस्था करणे व आसपासच्या १०४ खेडयांना पाणीपुरवठा करणे याविषयीचा जागतिक बँकेचा ८४ कोटी रु. खर्चाचा प्रकल्प महाराष्ट्र पाणी पुरवठा आणि मलोत्सर्ग मंडळाकडे जागतिक बँकेच्या मान्यतेने सोपविला आहे. प्राधिकरण हया कामाच्या प्रकल्पाचे संनियंत्रण करील. स्थानिक संस्थांकडून अपेक्षित असलेली सार्वजनिक वर्गणी उभी करण्याच्या कामी त्यांना प्राधिकरणाचे सदस्य संपूर्ण हार्दिक सहकार्य देतील असा विश्वास व आशा मला वाटते.

८. आतां कार्यसूची विचारार्थ घेण्यांत यावी.

-----------

हो: १२१२७९.

MINUTES OF THE 20TH MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 13th December, 1979.

Time : 11.00 a.m.

Place : Griha Nirman Bhavan,
3rd Floor, Bandra.

A list of Members and Invitees present is attached.

The Chairman in his inagural speech welcomed Shri Anant Narayan Thakur, elected as a Member of the Authority by the Chairmen of the Panchayat Samities in Kulaba District, and placed on record the appreciation of the services rendered by Shri P.D. Kasbekar, Ex-Chief Secretary, who retired on 1.10.1979. He also outlined in brief the important development with regard to the B.M.R.D.A. (A copy of the speech is enclosed).

2. Commenting on the Minister's speech some Members pointed out that there were no schemes for Thane Municipal Council undertaken by the BMRDA. The Member-Secretary, HURE Board, explained that we had taken up two Area Development Schemes in Thane - one at Panchapakhadi and the other in Chitalsal - Manpada.

3. Some of the Members wanted to know the names of the 104 villages covered by the Bombay Metropolitan Region Water Supply and Sewerage Scheme. The Metropolitan Commissioner promised to send this information to all the Members.

4. The meeting then proceeded with the regular agenda.

Item No. 1 : Confirmation of the Minutes of the 19th Meeting of the BMRDA held on 26th June, 1979.

The Minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken on the Minutes of the last(19th) Meeting of the BMRDA held on 26th June, 1979.

The action taken was noted.

Item No. 3 : Drafts of -

(i) The BMRDA (Allowances to Members) Regulations, 1979, and

(ii) the BMRDA (Allowances to Board Members) Regulations, 1979.

The Authority considered the agenda note and passed

the.....

the following Resolution :

RESOLUTION NO. 167 :

RESOLVED THAT the Draft -

(i) the BMRDA (Allowances to Members) Regulations, 1979, as shown in Annexure 'D' and

(ii) the BMRDA (Allowances to Board Members) Regulations, 1979, as shown in Annexure 'E'

as recommended by the Standing Committee in its fourteenth meeting held on the 14th July, 1979, (*vide* Resolution No.109) are passed.

RESOLVED FURTHER THAT these Regulations should be deemed to be framed by the Authority under Section 50 of the BMRDA Act, 1974.

Item No. 4 : The BMRDA (Employees' Contributory Provident Fund) Regulations, 1979.

Some of the Members enquired about the representation made by the Union of Employees in regard to the Regulations requesting that Dearness Allowances may be taken into account in calculating the subscriptions and contributions to the fund. It was explained that (i) the representation from the employees was received only two days before the meeting and it had not been possible to consider it and take a final view (ii) our Regulations were framed on the lines followed by Government Organisations. However we would take the request of the union into consideration before finalising the scheme.

The Municipal Commissioner pointed out that the implications of the request of the employees on other Government and semi-Government agencies may also be taken into consideration.

Some of the members also suggested the need for some redress for the family in the event of untimely death of an employee, by means of schemes like Family Pension Scheme. They also suggested that the question of instituting a regular Pension Scheme for employees may be examined. The Metropolitan Commissioner promised that these points would be considered, their implications studied and if necessary proposals would be brought up before the Authority. The Authority then approved the regulations and passed the

following.....

following Resolution :-

RESOLUTION NO. 168 :

RESOLVED THAT the draft BMRDA (Employees' Contributory Provident Fund) Regulations, 1979, as prepared and recommended by the Standing Committee in its fourteenth meeting held on the 14th July, 1979, vide Resolution 100 are passed. These Regulations shall be deemed to be prepared by the Authority under Section 50 of the BMRDA Act, 1974.

Item No. 5 : BMRDA Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974.

There was considerable discussion on this item. In particular the members raised the issue regarding the role of the BMRDA in the development of Bandra-Kurla, the reduction in the area of the Bandra-Kurla Complex and also emphasized the need to check unauthorised development in the Bandra-Kurla area.

Minister (Urban Development) explained the entire history xx of the Bandra-Kurla Complex and pointed out that the proposal before the meeting was not exclusion of the peripheral area which was already been sanctioned by the Government but only the consequential amendment to the BMRDA Notification, No. MC/RDM/3285/77, dated 10.6.1977, issued under Section 13 of the BMRDA Act. The exclusion was necessitated by the fact that most of these areas had already been developed and occupied by the University Campus and the Housing Board and other properties in the north and the Dharavi slums in the south and there was, therefore, little scope for the BMRDA to plan and develop this area unless all the lands are transferred to it. The members were particularly keen about the part of Dharavi coming into the original complex area and felt that the BMRDA should develop this area. The Minister (UD) explained that the original idea was that the entire complex should be developed by the BMRDA but later on other Authorities viz. the BMC and the MHADA, were reluctant to part with their lands and, therefore, it was decided that these Authorities may develop their own lands according to the Development Plan prepared by the BMRDA and the BMRDA should develop only the remaining vacant area which requires considerable investment for infrastructure including channelization.

The Members, however, wanted to discuss this question

further.....

further particularly the role of the BMRDA vis-a-vis the Bombay Municipal Corporation. It was, therefore, decided (i) that the consideration of the item should be postponed and (ii) the BMRDA should circulate a detailed note on the Bandra-Kurla Project.

<u>Item No. 6</u> : <u>Feasibility Study for a Truck Terminal at Wadala.</u>

Members generally welcomed the idea of the Truck Terminal and urged that it should be implemented as early as possible. The studious and methodical manner in which the Feasibility Report has been prepared was appreciated by the members and it was decided to record this appreciation. Some questions were raised about the costing details of the project but it was explained that this was only a feasibility report. After this is accepted in principle, further action to work out the cost of the project and other details could be taken up. Members suggested that care should be taken to provide for the parking of smaller vehicles (particularly hand-carts) and for dormitory accommodation for the workers who are often required to sleep near the go-downs.

The Municipal Commissioner raised two points : (i) the impact of this development on the surrounding area and (ii) whether the Bombay Municipal Corporation could refuse building permission for developments in the area.

The Member-Secretary, T. & C. Board, explained that the truck terminal is only a part of the larger area development plan for Wadala Anik. As regards control on other development pending the construction of the truck terminal, it was explained that the BMRDA has already prepared a lay-out plan for the whole area and submitted it to Government. The Government has been requested to issue a directive under Section 154 of the MRTP Act asking the Corporation to incorporate this lay-out plan (including the truck terminal) in the Development Plan. The Municipal Commissioner urged that this action may be taken early as otherwise it would be difficult for him to refuse permissions for any other kind of development permissible under the D.C. Rules, which may frustrate the truck terminal.

The representative of the Bombay Port Trust said that he had been instructed by the Chairman to bring to the notice of the Authority the following objections and suggestions of

the.....

the Bombay Port Trust :

(i) This area should be developed for housing;

(ii) the truck terminal will probably add to the pollution and ecological problems of the area;

(iii) the Port Trust is planning to shift some of the industries from its area; and this area should therefore, be earmarked for such industries to be shifted;

(iv) the truck terminal may be located somewhere in the swampy area between Wadala and Chembur; and

(v) there is already some unauthorised development on the land.

The Member Secretary, T. & C. Board, agreed to take the B.P.T. points into consideration before finalising the project proposa. In reply to a query, the Member Secretary, T. & C. Board, explained that the land on which the truck terminal is to be built, does not belong to the Port Trust. Almost all the land involved belongs to the Government of Maharashtra or the Government of India.

The Authority decided that the proposal should be approved in principle and the points of the Port Trust may be looked into by the T. & C. Board later on. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 169 :

RESOLVED THAT the Authority having considered the feasibility report of a Truck Terminal at Wadala-Anik, prepared by Transport & Communications Board, hereby approves the proposal of the T. & C. Board for the setting up and construction of a Truck Terminal on land to be acquired and developed for the purpose at Wadala-Anik, together with its approach road and endorses the objectives and proposals comprising the project, as per details set out in the feasibility study report presented together with the agenda notes as Item No. 6 of this meeting.

RESOLVED FURTHER THAT the Authority hereby authorises the Standing Committee, the Executive Committee and the Metropolitan Commissioner to take all necessary action, within their respective powers and competence, to implement the above project expeditiously, including the preparation of the necessary legislation.

Item No. 7 : Accounts.....

Item No. 7 : Accounts of the Authority for the year 1978-79 and Report of the Financial Adviser, thereon :-

The Accounts and the Report were approved.

Item No. 8 : Bombay Urban Transport Project proposed extension of project period.

The Authority approved the proposed extension of the project period and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 170 :

RESOLVED THAT the Authority hereby approves, ex-post-facto, the extension of the Project completion date of the Bombay Urban Transport Project from 31st December, 1979 to 31st December, 1982, and the plan closing date from 30th June, 1980 to 30th June, 1983, to enable the Municipal Corporation of Greater Bombay and the Bombay Electric Supply and Transport Undertaking to complete all the works and procurement envisaged thereunder and to withdraw the loan funds, to which the Chairman of the Authority has already given his approval in anticipation of the Authority's approval.

RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner is hereby authorised to approach the World Bank and to take all such action as may be necessary, on behalf of the Authority for extension of the project period as above and also to make suitable amendments to the Loan Agreement, and the Subsidiary Loan Agreement, etc.

RESOLVED FURTHER THAT the action taken by the Chairman of the BMRDA in sanctioning the above action in anticipation of the approval of the Authority is approved.

Item No. 9 : Reporting details of 'India-Maharashtra Water Supply and Sewerage Project' to be taken up by Maharashtra Water Supply & Sewerage Board with assistance of International Bank for Re-construction & Development (IBRD), Government of India (GOI), Govt. of Maharashtra (GOM), and Public Contribution (PC).

This item was only for the information of the Members and was noted by the Authority. The Chairman directed that the list of 104 villages be furnished to the members.

$$$$$$$$$$$

Vp:9180.

423

# TWENTIETH MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 13th December, 1979.

MEMBERS PRESENT :

| | | |
|---|---|---|
| 1) | Shri Hashu Advani,<br>Minister for Urban Development and B.M.R.D.A. | Chairman. |
| 2) | Shri R.K. Chimbulkar,<br>Mayor of Bombay. | Vice-Chairman. |
| 3) | Shri B.L. Patil,<br>Minister of State for Dairy Development and Khar Lands. | Member. |
| 4) | Shri B.H. Shete,<br>Chairman,<br>Standing Committee,<br>Bombay Municipal Corporation. | Member. |
| 5) | Shri P.D. Niklankar,<br>Chairman,<br>Improvement Committee,<br>Bombay Municipal Corporation. | Member. |
| 6) | Shri E.R. Koparde,<br>Municipal Councillor,<br>Bombay Municipal Corporation. | Member. |
| 7) | Shri V.G. Dharap,<br>Municipal Councillor,<br>Bombay Municipal Corporation. | Member. |
| 8) | Shri A.W. Patil,<br>Municipal Councillor,<br>Bombay Municipal Corporation. | Member. |
| 9) | Shri C.C. Bhujbal,<br>Municipal Councillor,<br>Bombay Municipal Corporation. | Member. |
| 10) | Shri A.N. Thakur,<br>Chairman,<br>Panchayat Samiti, Uran. | Member. |
| 11) | Shri D.G. Kamat,<br>M.L.A. | Member. |
| 12) | Shri G.M. Koli,<br>M.L.A. | Member. |
| 13) | Shri D.N. Patil,<br>M.L.A. | Member. |
| 14) | Shri S.D. Baswant,<br>M.L.C. | Member. |
| 15) | Shri D.B. Sule,<br>M.L.C. | Member. |

.....2/-

16) Shri Ram Kapse, Chairman, CIDCO. — Member.

17) Shri B.K. Chougule, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. — Member.

18) Shri N.G.K. Murti, Chairman, Water Resources Management Board. — Member.

19) Shri D.K. Afzulpurkar, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. — Member-Secretary.

INVITEES :

1) The Managing Director, C.I.D.C.O.

2) Secretary to Government, Urban Development Department, Mantralaya, Bombay-400 032.

\#\#\#\#\#\#\#\#\#\#

Vp:9180.